# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०४/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

**नागपूर ग्रामीण पोलीस दलातील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना भावपुर्ण निरोप**

दिनांक ३०/०४/२०२४ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **''निरोप समारंभाच्या''** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) पोलीस उपनिरीक्षक श्री. सुर्यप्रकाश मिश्रा पोलीस स्टेशन खापरखेडा २) पोलीस उपनिरीक्षक श्री. संजय जासुतकर नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण ३) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. रामबिसाल मिश्रा मोटर परिवहन विभाग नागपूर ग्रामीण ४) सहायक फौजदार अशोक पाटील नागरी हक्क संरक्षण नागपूर ५) सफौ. किसन कोकोडे पोलीस स्टेशन खापा यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी अंमलदारांना पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर